भारतीय गैर न्यायिक

भारत INDIA

रु. 500 FIVE HUNDRED RUPEES

पाँच सौ रुपये सत्यमेव जयते Rs. 500

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA ◑ 2018 ◑ AL 772886

Sub-Treasury Officer Daund

20 DEC 2018

Sub Treasury Officer
Daund, Dist. Pune

मुद्रांक विक्री नोंद वही अनुक्रमांक ११०३२ दिनांक २३/९/२०१९

मुद्रांक वापराचे कारण ........ करारनामा

मुद्रांक विकत घेणा-याचे नाव ........ [illegible] डेव्हलपर्स कार्पो. प्रा.लि.

पत्ता ........ हडपसर पुणे

हस्ते ........ [illegible]

मुद्रांक शुल्क रक्कम........ ५००

सही

मा. कि. टिळेकर
( मुद्रांक विक्रेता ) केडगांव ता. दौंड जि.पुणे
मु. वि. प.क्रं २२०५०१०
मु. वि. प. मुदत ३१/३/२०२१

ज्या कारणासाठी ज्यांनी मुद्रांक खरेदी केला त्यांनी त्याच कारणासाठी मुद्रांक खरेदी केल्यापासुन ६ महिन्यात वापरणे बंधनकारक आहे.

Scanned with CamScanner

भारतीय गैर न्यायिक

एक सौ रुपये Rs. 100

रु. 100 ONE HUNDRED RUPEES

सत्यमेव जयते

भारत INDIA

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA ◑ 2018 ◑ TX 892970

Sub-Treasury Officer Daund

20 DEC 2018

Sub Treasury Officer
Daund, Dist. Pune

सदरचा मुद्रांक लिव्ह अँण्ड लायसन्ससाठी नाही.

मुद्रांक विक्री नोंद वही अनुक्रमांक ११०३३ दिनांक २३/१ /२०१९

मुद्रांक वापराचे कारण ........................ प्रतिज्ञापत्र

मुद्रांक विकत घेणा-याचे नाव ........................

पत्ता ------------------------

हस्ते ........................

मुद्रांक शुल्क रक्कम........................ 100

सही

मा. कि. टिळेकर

( मुद्रांक विक्रेता ) केडगांव ता. दौंड जि.पुणे

मु. वि. प.क्रं २२०५०१०

मु. वि. प. मुदत ३१/३/२०२१

ज्या कारणासाठी ज्यांनी मुद्रांक खरेदी केला त्यांनी त्याच कारणासाठी मुद्रांक खरेदी केल्यापासुन ६ महिन्यात वापरणे बंधनकारक आहे.

Scanned with CamScanner

# पुरवणी विहीर पाणीहक्क विक्री करारनामा

पुरवणी विहीर पाणीहक्क विक्री करारनामा आज दिनांक २२ माहे जानेवारी इसवी सन २०१९ रोजी वाई मुक्कामी..

**मे. लॅन्डमार्क डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन प्रा.लि. कंपनी,**
भारतीय कंपनी कायदा, १९५६
अंतर्गत नोंदविलेली, जिचे नोंदणीकृत कार्यालय
लॅन्डमार्क हाऊस, सर्व्हे नं. ६४,
स्वामी विवेकानंद गार्डन शेजारी,
गंगाधाम रोड, कोंढवा बु।। पुणे–४८
PAN No: AACCL 4612 Q
तर्फे संचालक

**१. श्री. रूपेश विलास चव्हाण** — लिहून घेणार
वय ३२ वर्षे , धंदा – व्यापार व शेती
रा.कात्रज, पुणे – ४११ ०४६.

**२. श्री. विशाल विलास चव्हाण**
वय ३६ वर्षे , धंदा – व्यापार व शेती
रा.कात्रज, पुणे – ४११ ०४६.

यांसी

**श्री.दामोधर बाबा फणसे**
वय – ५५, धंदा – शेती — लिहून देणार
रा.मौजे वरखडवाडी, ता.वाई, जि.सातारा.

**कारणे पुरवणी विहीर पाणीहक्क विक्री करारनामा लिहून देतो ऐसा जे की,**

१. मिळकतीचे वर्णन :– तुकडी सातारा, पोट तुकडी तालुका वाई, मा. दुय्यम निबंधक, ता. वाई, पुणे यांचे हददीतील तसेच जिल्हा परीषद सातारा व पंचायत समिती ता. वाई याचें हददीतील गांव **मौजे वरखडवाडी** येथील शेतजमिन यासी गट नं. ४६८ यांसी गट नंबर ४६८ यांसी क्षेत्र ०० हेक्टर २४ आर + पोटखराबा ०० हेक्टर ०२ आर अशी एकूण क्षेत्र ०० हेक्टर २६ आर यांसी आकार ०० रुपये ६२ पैसे या मिळकतीपैकी विहीर पाणीहक्क विक्री करारनामा करावयाची मिळकत यांसी क्षेत्र ०० हे ०२ आर ही जमिन मिळकत यांसी चतु:सिमा :–



Scanned with CamScanner

उत्तरेस : लागून ओढा.

दक्षिणेस : श्री दामोधर फणसे यांचे मालकी क्षेत्र.

पूर्वेस : श्री दामोधर फणसे यांचे मालकी क्षेत्र.

पश्चिमेस : मौजे अभेपुरी गावची शिव.

२. येणेप्रमाणे वर नमूद केलेली मिळकत ही लिहून देणार यांचे मालकी वहिवाटीची आहे. सदर मिळकतींचा उपभोग घेण्याचे व वहिवाट करण्याचे संपूर्ण हक्क व अधिकार हे लिहून देणार यांना आहेत.

३. येणेप्रमाणे लिहून देणार यांचे समाईक मालकीची वर नमूद मिळकतीमध्ये विहीर आहे. तसेच लिहून देणार यांना त्यांचे शेतीचे व्यवसााय वृध्दी कामी पाण्याची नितांत आवश्यकता आहे. त्याकामी लिहून देणार यांनी धोम पाटबंधारे विभाग वाई यांचेकडून शेतीच्या पाण्यासाठी जल उपसा सिंचन योजनेअंतर्गत धोम धरणातून पाणी उपसा करण्यासाठी अर्ज केलेला आहे. मात्र सदर धरणापासून लिफटने पाणी पुरवठयाची सोय करणे आर्थिकदृष्टया अतिशय कष्टाचे व खर्चाचे होणार आहे. लिहून देणार यांना त्यांचे आार्थिक अडचणीमुळे धोम धरणातून लिफटद्वारे शेती साठी पाणी आणणे शक्य होणार नाही.

त्याचप्रमाणे लिहून घेणार यांनी त्यांचे कंपनीचे माध्यमातून मौजे वरखडवाडी, ता.वाई येथील गट नंबर ६१८पैकी, ६३५, ६३६ पैकी तसेच मौजे अभेपुरी येथील मिळकत गट नंबर २०७ या श्री.हेमंत भरत कचरे व इतर इसम ९ यांचे मालकीच्या बिनशेती मिळकती विकसनास घेतलेल्या आहेत. सदर मिळकती विकसित करीत असताना मिळकत विकसनाचे दृष्टीने लिहून घेणार यांना विकसनाकामी पाण्याची नितांत आवश्यकता आहे.

याबाबत लिहून देणार व घेणार यांनी एकमेंकांत विचारविनिमय करुन लिहून घेणार यांनी लिहून देणार यांची अडचण समजून घेवून धोम धरणातून लिफट द्वारे पाणी पुरवण्यासाठी आर्थिक तसेच इतर मदत करणेस काही अटी व शर्तीवर तयार झाले. सदर अटी व शर्तीवर लिहून देणार यांना शेतीसाठी तसेच लिहून घेणार यांना त्यांचे गरजेनुसार पाणी उपलब्ध करुन देण्याचे दृष्टीने सदरील लिहून देणार व लिहून घेणार यांचे लाभांत विहीर पाणी हक्क विक्री करारनामा खालील अटी व शर्तींच्या अधिन राहून लिहून, नोंदवून देत आहेत.



Scanned with CamScanner

४. लिहून देणार यांचे मालकीची वर नमूद मिळकत ही कोणत्याही कोर्टात अगर महसूल अधिकाऱ्यापुढे वादाचा, तंट्याचा, चौकशीचा विषय म्हणून दाखल नाही, सदर जमिनीवर श्री बहिरदेव वहिवाटदार श्री.भिकू सदाशिव गुरव यांचे मालकी हक्क सदराखाली सदर लिहून देणार श्री.दामोधर बाबा फणसे यांचे नाव एकत्र कुटूंबकर्ता म्हणून दाखल आहे. तसेच सदर मिळकतीमध्ये त्यांचे इतर कुटूंब घटक यांचा देखील समाईक हिस्सा आहे. या व्यतिरिक्त सदर जमीनीवर अन्य कोणचाही अन्नवस्त्र–चोळी, बांगडी, पोटगी, लीज, लीन, साठेकरार, गहाण, दान, बक्षीस, कुळखंड, वहिवाट, वगैरे भाऊ हिस्सा, अग्रेसर हक्क वगैरे व अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, दावा बोजा नाही. सदर मिळकत ही कोणत्याही वादाचा विषय नाही अथवा सदर मिळकती बाबत कोणत्याही कोर्टात दावा प्रलंबित नाही अगर कोणत्याही न्यायालयाचा सदर मिळकती बाबत पुढील व्यवहार करण्यास कोणतेही मे. न्यायालयाचा मनाई हुकुम नाही यांची खात्री व भरवसा सदरील लिहुन देणार यांनी लिहुन घेणार यांना दिला आहे. सदर मिळकतीचे क्षेत्र कोणत्याही सरकारी वा निमसरकारी कामासाठी अॅक्वायर झालेली नाही अगर त्याबाबत नोटीसा निघालेल्या नाहीत अथवा सदरची मिळकत ही अन्य व्यक्तीबरोबर कोणत्याही कोर्टात वादाचा, दाव्याचा, जप्ती व जामिनीकीचा विषय नाही. याबाबतची खात्री व भरवसा लिहून देणार यांनी लिहून घेणार यांना दिलेला आहे.

५. येणेप्रमाणे वर नमूद लिहून देणार यांचे मालकीच्या गटनंबर ४६८ मध्ये विहीर असून लिहून देणार हे पूर्वीपासून आजतागायत सदर विहीरीतून शेतीकामी पाण्याचा उपसा करुन सदर पाणी शेतीकामी वापरतात. सदर ठिकाणी लिहून देणार यांचे मालकीची पाच हॉर्स पॉवरची मोटर असून सदर इलेक्ट्रीक मोटर द्वारे शेतीसाठी पाण्याचा वापर लिहून देणार हे वेळोवेळी करीत असतात.

६. सदर मिळकतीमध्ये लिहून देणार यांचे नावाने महाराष्ट्र राज्य विदयुत वितरण कंपनीचे नावाने स्वतंत्र लाईट मीटर असून त्याचे नियमाप्रमाणे येणारे बिल लिहून देणार हेच आजपावेतो भरीत आलेले आहेत. सदर मिळकतीमध्ये लिहून घेणार यांचेकरिता स्वतंत्र महाराष्ट्र राज्य विदयुत वितरण कंपनीच सब मिटर घेण्याचे आहे सदर मिटरचा वापर लिहून घेणार यांनी त्यांचे पाणीवापराकरिता करावयाचा आहे व त्याप्रमाणे सब मिटरचे होणारे रिडिंग प्रमाणे योणारे विदयुत बिल महिन्याचे महिन्याला भरण्याचे आहे तसेच लिहून घेणार यांनी भविष्यात स्वतंत्र वीज मिटर घेतल्यास त्यासाठी लिहून देणार यांनी संमती दिलेलि आहे व



Scanned with CamScanner

त्याचे येणारे बिलसुध्दा लिहून घेणार यांनी भरावयाचे आहे. तसेच सदर लिहून घेणार यांनी म्हणजेच लिहून देणार यांना सदर मिळकतीमध्ये विहीरीचे पाणी वापरण्याचे व तिचा पूर्ण उपभोग घेण्याचे संपूर्ण हक्क व अधिकार प्राप्त झालेले आहेत. सदर प्राप्त हक्क व अधिकारानुसार लिहून देणार हे लिहून घेणार यांचे लाभांत सदर विहीर पाणी हक्क विक्री करारनामा आजरोजी लिहून घेणार यांचे लाभांत लिहून नोंदवून देत आहेत.

७. सदर लिहून देणार व लिहून घेणार यांचे दरम्यान सदर विहीर पाणी हक्क विक्री करारनाम्याच्या अटी व शर्ती ठरल्या त्याखालीलप्रमाणे..

१. सदर मिळकतीचे कबजेदार सदरी श्री बहिरदेव देवस्थान वहिवाटदार भिकु सदाशिव गुरव श्री.दामोधर बाबा फणसे परभारे जुडी देवून तरणा प्रमाणे आकार मालकास देतात याप्रमाणे शेरा दाखल आहे. म्हणजेच सदर मिळकत विक्री करणेकामी किंवा मिळकतीचे संबंधात होणा–या बदलांबाबत धर्मदाय आयुक्त सातारा / तहसिलदार वाई / इतर तत्सम सक्षम प्राधिकारी यांचेकडून रितसर परवानगी घेणे आवश्यक आहे. सदर परवानगी मिळणेकामी लिहून देणार यांनी आवश्यक तेथे अर्ज तसेच प्रतिज्ञापत्र सादर करणे बंधनकारक असल्यास त्याप्रमाणे अर्ज प्रतिज्ञापत्र सादर करुन परवानगी मिळविणेची आहे. त्याकामी होणारा खर्च करणेस लिहून घेणार हे तयार असून त्याबाबत त्यांची कोणतीही तक्रार अगर हरकत नाही. सदर परवानगी कामी लिहून देणार यांनी लिहून घेणार यांना पूर्णपणे सहकार्य करण्याचे मान्य आणि कबूल केलेले आहे.

२. लिहून घेणार यांनी त्यांना आवश्यकता भासेल त्याप्रमाणे सदर विहीरीतून प्रतिदिन २० ते २५ हजार लिटर पाण्याचा उपसा करावयाचा आहे. सदर बाबत लिहून देणार यांची कोणत्याही प्रकारची तक्रार अगर हरकत नसून संमती आहे.

३. सदर विहीरीतून पाणी पुरवठा करण्यासाठी लिहून घेणार आणि लिहून देणार यांचे दरम्यान मोबदला **रक्कम रुपये ५,००,०००/– अक्षरी रक्कम रुपये पाच लाख मात्र** इतका ठरलेला आहे. सदर मोबदला हा लिहून देणार यांना खाली भरणा तपशिलात नमूद केल्याप्रमाणे मिळालेला आहे.



Scanned with CamScanner

४. यापूर्वीचा विहीर पाणीहक्क विक्री करारनामा हा केवळ लिहून देणार क्रमांक १ यांचेबरोबर दिनांक २०/०१/२०१५ रोजी करण्यात आलेला होता. तसेच पुरवणीविहीर पाणीहक्क विक्री करारनामा लिहून देणार क्रमांक १ यांचेबरोबर दिनांक ०२/०९/२०१५ रोजी करण्यात आलेला होता. सदर मिळकती मध्ये लिहून देणार क्रमांक १ यांचा देखील समाईक हिस्सा आहे. सदर मिळकतीमध्ये असणारे विहीरीतून त्यांना देखील नियमितपणे पाणी घेण्याचा हक्क व अधिकार आहे. त्यामुळे लिहून देणार क्रमांक १ यांना देखील या पुरवणी करारनाम्यात समाविष्ट करण्यात आलेले आहे.

५. तसेच सदर विहीरीवर रिंग बांधकाम करुन बसविण्याचे काम हे मे. लॅन्डमार्क डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन प्रा.लि. व लॅन्डमार्क वाई वूड्स क्लस्टर १ देखभाल सहकारी संस्था मर्या., लॅन्डमार्क वाई वूड्स क्लस्टर २ देखभाल सहकारी संस्था मर्या., लॅन्डमार्क वाई वूड्स क्लस्टर ३ देखभाल सहकारी संस्था मर्या., च्या कस्टमरर्स हे मिळून करीत असून त्याबाबत ची कल्पना लिहून देणार यांना दीलेली आहे. सदर कामासाठी अंदाजे येणारा खर्च रक्कम रुपये २ ते ३ लाख अपेक्षित आहे.

६. तरी सदरचे काम झाल्यावर पणी पूरवठयास कोणतीही अडचण भविष्यात होणार नाही असे अश्वासन लिहून देणार हे हया पुरवणी करारनाम्यामधून देत आहेत.

७. सदर विहीरीची मिळकत ही जरी ट्रस्ट, संस्था अथवा सामाई मालकी हक्काची असली तरीही विहिरीचे सदर क्षेत्र असलेली मिळकत ही श्री. दामोदर बाबा फणसे यांची आहे व त्यामध्ये कोणाचाही हक्क नाही, असा भरवसा लिहून देणार यांनी दिला आहे

८. भविष्यात लिहून घेणार मे. लॅन्डमार्क डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन प्रा.लि. व लॅन्डमार्क वाई वूड्स क्लस्टर १ देखभाल सहकारी संस्था मर्या., लॅन्डमार्क वाई वूड्स क्लस्टर २ देखभाल सहकारी संस्था मर्या., लॅन्डमार्क वाई वूड्स क्लस्टर ३ देखभाल सहकारी संस्था मर्या., यांना कोणतीही अडचण आली तरीही त्याचे निवारण लिहून देणार यांचेवरती बंधनकारक राहील,त्याची कोणतीही आर्थिक झळ ही मे. लॅन्डमार्क डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन प्रा.लि. अथवा सोसायटी कलस्टर यांना लागणार नाही असे आश्वासन या करारनाम्यातून देत आहेत.

येणेप्रमाणे सदर विहीर पाणी हक्क विक्री करारनामा आजरोजी लिहून देणार यांनी राजीखुशीने स्वसंतोषाने कोणतेही धाक दडपणास बळी न पडता समजून उमजून लिहून, नोदंवून दिला असे.



Scanned with CamScanner



श्री.दामोधर बाबा फणसे

लिहून देणार

मे. लॅन्डमार्क डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन प्रा.लि. कंपनी
तर्फे संचालक



१. श्री विशाल विलास चव्हाण



२. श्री. रूपेश विलास चव्हाण

लिहून घेणार



Scanned with CamScanner

१. लॅन्डमार्क वाई वूड्स क्लस्टर १ देखभाल सहकारी संस्था मर्या-

तर्फे सोसायटी ऑफिसर्स

१.श्री अमिताभ धर दुबे

२. लॅन्डमार्क वाई वूड्स क्लस्टर २ देखभाल सहकारी संस्था मर्या.

तर्फे सोसायटी ऑफिसर्स

२. श्री अजय भारद्वाज

३. लॅन्डमार्क वाई वूड्स क्लस्टर ३ देखभाल सहकारी संस्था मर्या.

तर्फे सोसायटी ऑफिसर्स

३. श्री आनंद महिपतराव कुलकर्णी

लिहून घेणार

साक्षीदार –

१.________________

२.________________



Scanned with CamScanner